दैनिक
महावृत्त
ई – मेल dainikmhavratt@gmail.com
संपादक : अशोक हनवते.मो.९४२१०९४९९१,७२६४०७९९९०

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १०१ वा शुक्रवार दि.०१ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

राज्यावर दुष्काळाचे सावट

मुंबई : भारतासह राज्यावर दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. तीन महिन्यांत पावसाची मोठी तूट दिसून आली आहे. महाराष्ट्र आणि केरळमध्ये पावसाने पाठ फिरवली आहे. ऑगस्ट महिन्यात भारतात शतकातील सर्वांत कमी पावसाची नोंद झाली आहे. आतापर्यंत ऑगस्ट महिन्यात फक्त १६० मिमीच्या जवळपास पाऊस झाला. ऑगस्ट २०२३ मान्सून वर्ष १९०१ नंतरचा सर्वात कोरडा महिना नोंदवला गेला आहे. त्यामुळे यंदा दुष्काळाची स्थिती ओढावली आहे.

१ जूनपासून संपूर्ण देशात मान्सूनमध्ये पावसाची तूट वाढत गेली. ऑगस्टअखेरपर्यंत देशातील पावसाची तूट ९ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचली आहे. त्यातच पुन्हा एकदा मान्सून ब्रेकची स्थिती असल्याने ही तूट आणखी वाढण्याची भीती वर्तवण्यात आली. देशातील

काही भागांत सध्या चांगला पाऊस झाला आहे तर काही भागात अद्यापही पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरीच्या २२ टक्के पावसाची तूट झाल्याचे पाहायला मिळत आहे. मराठवाड्यातदेखील १ जूनपासून सरासरीच्या १९ टक्के पावसाची तूट पाहायला मिळत आहे, असेही हवामान खात्याने म्हटले आहे.

ऑगस्ट महिन्याचा विचार केला तर राज्यात सरासरीच्या उणे ५८ टक्के तूट निर्माण झाली आहे. कारण ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या फक्त ४२ टक्के पाऊस झाला. सर्वात विदारक परिस्थिती मराठवाड्यात आहेत. कारण येथे सरासरीच्या केवळ २८ टक्के पाऊस झाला. त्याखालोखाल मध्य महाराष्ट्र आणि कोकणात केवळ ३६ टक्के पाऊस पडला. राज्यातील १५ जिल्ह्यांत पावसाच्या सरासरीतील तूट मोठी आहे. या मोठ्या तुटीमुळे आणि पुढचे काही दिवस पावसाची शक्यता नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

जी–२० अतिथींसाठी खास 'मिलेट थाळी' तयार

नवी दिल्ली : भारताच्या अध्यक्षतेखाली ९ आणि १० सप्टेंबर रोजी दिल्ली येथे जी–२० शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेची तयारी जोरात सुरू आहे. दरम्यान, जी–२० शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील पंचतारांकित हॉटेल्स, परदेशी पाहुण्यांना भारतीय जेवणाची चव देण्यासाठी विशेष तयारी करत आहेत. भारत २०२३ हे वर्ष बाजरी वर्ष म्हणून साजरे करत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्यासह सर्व नेते आणि परदेशी प्रतिनिधींसाठी खास 'मिलेट थाली' (बाजरीची थाळी) तयार करण्यात आली आहे. मोदी सरकारने बाजरीला 'श्रीअण्णा' असे नाव दिले आहे.

भारतात जी–२० कार्यक्रमासाठी येणाऱ्या पाहुण्यांना फक्त शाकाहारी जेवण दिले जाईल. मासांहारी पदार्थ या परिषदेपासून लांब ठेवण्यात आले आहेत. सर्व देशाचे प्रमुख नेते आणि त्यांचे प्रतिनिधी भारतातील विविध शाकाहारी पदार्थांचा आस्वाद घेतील.

युवा व्याख्याते अविनाश भारती यांचा संतोष सोमवंशी यांच्या कार्यालयात सत्कार

लातूर :– लातूर येथील महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांच्या जनसंपर्क कार्यालय प्रसिद्ध नएए टॉकीज फेम समाजप्रबोधनकार युवा व्याख्याते कवी किर्तनकार अविनाश भारती यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला. लातूर जिल्हातील शिवली मुळ गाव असलेले पण आता घाटनांदुर येथे स्थायिक असलेले एका सामान्य कुटुंबातील जन्म झालेले आई वडील मोल मजुरी करणारे अशी एक युवक आज ज्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपल एक वेगळ नाव कमवल आहे जे युवा व्याख्याते कवी आणि किर्तनकार असा त्रिवेणी संगम असलेले एकमेव युवक म्हणजे अविनाश भारती आहेत त्यांच्या महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी सत्कार केला यावेळी शिवसेना युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, हिप्परसोगा सरपंच मनोज सोमवंशी, धानोरा सरपंच सुरेश मुसळे अदी उपस्थित होते

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने अहमदपूर येथे गायनाचा कार्यक्रम संपन्न..

अहमदपूर / प्रतिनिधी:–साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने येथील साठे नगर येथे गायनाचा जंगी कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ड माजी समाजकल्याण सभापती मा.टि एन कांबळे साहेब, युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, माजी नगरसेवक मा.अभय भाऊ मिरकले,सामाजिक कार्यकर्ते खुरमखान पठाण,सय्यद तबरेज आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सुरुवातीला वस्ताद लहुजी साळवे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती

मंडळाचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष मुकुंद वाघमारे यांनी करून जयंती सोहळा दिमाखदार पद्धतीने करण्यासाठी सर्व पदाधिकारी यांना सोबत घेवून हा सोहळा यशस्वी केला.काहीजणांनी याला अडचणी आणण्याचा प्रयत्न केला मात्र सबंध समाज बांधव सोबत असल्यामुळे या अडचणीवर आपण मात करू शकलो. अण्णाभाऊंच्या विचाराचा प्रसार करण्यासाठी अशा गायन कार्यक्रमाची आवश्यकता असल्याने हा कार्यक्रम घेतला असल्याचे सांगीतले. याप्रसंगी डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनीही मधोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन गिरीश गोंटे सर यांनी केले तर शाम डावरे यांनी आभार मानले. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी. बालाजी डावरे डावरे, अमित वाघमारे, कुष्णा डावरे,सुमित वाघमारे, विकास वाघमारे, अविनाश वाघमारे, नामदेव डावरे,दिनेश डावरे,पिराजी वाघमारे,बाबा डावरे, खंडू डावरे,आकाश डावरे,पृथ्वीराज डावरे,माधव डावरे,सुरेश कसबे,आनंद शिंदे, यांनी पुढाकार घेतला.

शेतकऱ्यांना त्रास देऊ नका अन्यथा घरी पाठवेन – देवेंद्र फडणवीस..

औशाच्या बैठकीत उपमुख्यमंत्र्यांचा फोनवरून महावितरणच्या अधिकाऱ्यांना इशारा

औसा – लातूर जिल्ह्यात गेल्या एक महिन्यापासून पावसाने दडी मारली आहे. पावसाअभावी उभी पिक हातची जाण्याची वेळ आली आहे.पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही पिकांना विहिरीतील पाण्यावर जगवावे, तर महावितरणकडून वीजपुरवठा सुरळीत होत नाही.याबरोबर महावितरण कडून आवश्यक साहित्याचा पुरवठा केला जात नसून या दृष्टचक्रात अडकलेल्या शेतकऱ्यांनी आपली व्यथा आमदार अभिमन्यू पवार यांनी (दि.३१) रोजी आयोजित केलेल्या औसा येथील महावितरण च्या बैठकीत मांडली. हे ऐकून आ. अभिमन्यू पवार यांनी बैठकीतूनच थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बैठकीतूनच फोन लावला.यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी महावितरण अधिकार्यांना खडेबोल सुनावत शेतकऱ्यांना त्रास देऊ नका अन्यथा घरी पाठवेन असा सज्जड दम दिला.

महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यातील पिकांची परिस्थिती बिकट झाली असून औसा विधानसभा मतदारसंघातील या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आ. अभिमन्यू पवार यांनी गुरुवारी औसा येथे महावितरणचे अधिकारी व सरपंच यांची आढावा बैठक घेतली.या बैठकीत मुख्य अभियंता सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता मदन सांगळे, निलंगा येथील अभियंता जाधव, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार भरत सूर्यवंशी आदी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घेत यावर तातडीने मार्ग काढण्यासाठी आ. अभिमन्यू पवार यांनी बैठकीतूनच थेट राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच फोन लावून फोन महावितरणच्या अधिकाऱ्याला देत सभागृहातील माईकवरून देवेंद्र फडणवीस आणि संबंधित अधिकाऱ्याचे संभाषण सगळ्या सभागृहाला ऐकवले. आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना महावितरणच्या बेजबाबदारपणामुळे अजून मनस्ताप करण्याची वेळ येत असल्याचे कळताच उपमुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून चांगलाच दम भरत शेतकऱ्यांना जर कुठला अधिकारी अडचणीत आणत असेल तर त्याला निलंबित करेन. पाऊस नाही, पिके सुकून जात आहेत, शेतकऱ्यांनी जगावे कसे हा प्रश्न सतावत असतांना भविष्यातील उपाययोजना तर तुम्ही राबवाच पण तात्काळ उपाययोजना करून वीज वितरण सुरळीत सुरू करा. या कामांमध्ये जर कोणी हयगय करीत असेल तर तुम्हा सर्वांनाच मी घरी पाठवेनऋ, असा दम फडणवीसांनी फोनवरून दिला.

.....

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री संवेदनशील....

दरम्यान आज झालेल्या बैठकीत शेतकरी व सरपंच यांच्या तक्रारी लक्षात घेता आ. अभिमन्यू पवार यांनी थेट उपमुख्यमंत्र्यांना सर्वासमोर फोन करीत समस्यांचा पाडा वाचला तसेच महावितरण कडून शेतकऱ्यांना होणारा त्रास निर्देशनास आणून दिला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी महावितरण च्या अधिकाऱ्यांना कोरड्या दुष्काळाच्या पाश्र्वभूमीवर संवेदनशील राहून शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याचा कसल्याही तक्रारी समोर आल्या तर अधिकाऱ्यांना जबाबदार धरून कारवाई करण्याचा इशारा दिला. सदर दुष्काळाची दाहकता लक्षात घेता उपमुख्यमंत्री याबाबत किती गंभीर आहेत हे दिसून येते.

.....

जिथे कमी दाबाने वीजपुरवठा होतोय तिथे उच्च दाबाने वीजपुरवठा व्हावा यासाठी अतिरिक्त क्षमतेच्या रोहित्री बसविण्यात यावे जेणेकरून शेतीला उच्च दाबाने वीजपुरवठा होईल. मतदारसंघात सुरळीतपणे वीजपुरवठा होण्याच्या दृष्टीने नवीन वीज उपकेंद्राची निर्मिती केली जात आहे.तर सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्रीसाठी आमदार फंडातून रोहित्री दिल्या जात असून सुरळीतपणे वीजपुरवठा बाबत आपण प्रयत्नशील असल्याचे यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले..

मुख्यमंत्री साह्यता निधीतून लातूर जिल्ह्याला भरघोस मदत – आ अभिमन्यू पवार मदनसुरी येथील आरोग्य शिबीरात ७४१ लोकांनी घेतला लाभ...

निलंगा – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने अवघ्या एका वर्षात मुख्यमंत्री साहयता निधीतून राज्यात ११५ कोटींचा निधी वाटप केला असून याच मदतीचा मोठा वाटा लातूर जिल्ह्याला मिळाला आहे.याचबरोबर माहात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत राज्यातील जनतेला गंभीर आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया उपचारांसाठी दिड लाखांवरून ५ लाख रुपयांची तरतूद या सरकारने केली असून कितीही दुर्धर आजार असू त्यावर उपचार करण्यासाठी आपण सर्वस्वी करु अशी ग्वाही आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.

मदनसुरी (ता. निलंगा) येथे आ. अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या पुढाकाराने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर

माहात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत अंतर्गत मोफत सर्व रोग निदान व उपचार आरोग्य शिबीराचे आयोजन (दि.३१) ऑगस्ट रोजी करण्यात आले होते.याप्रसंगी डॉ मेघराज चावडा, डॉ आनंद बरगाले, डॉ हेमंत लोहार, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे सचिव सुहास पाचपुते, गटविकास अधिकारी अकिले, सरपंच अशोक सुर्यवंशी, उपसरपंच दत्ता जाधव,ॲड ओम माने , जिलानी बागवान, प्रकाश माने, बळवंत पाटील, मोहसीन शेख, इम्रान सय्यद,रविशंकर केंद्रे, प्रा सतिश हानेगावे, लालासाहेब शेख आदीसह मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. यावेळी आ. अभिमन्यू पवार बोलत होते की क्रिएटिव्ह फाऊंडेशने या काही वर्षांत वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांने चांगले काम हाती घेतले आहे. थोड्याच दिवसात क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या पुढाकारानेच किल्लारी व कासारसिरसी येथे भव्य सर्वरोग निदान शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातील नामांकित वैद्यकीय अधिकार्यांची उपस्थिती राहणार असून या शिबिराचा लाभ घ्यावा महिलांनी आरोग्यासाठी जागरुक राहणे आवश्यक आहे. वयाच्या पन्नाशीनंतर प्रत्येकाने वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे. जेणेकरून दुर्धर आजाराच्या पहिल्या टप्प्यातच आपण त्यावर मात करू शकतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने आरोग्य योजनेतून भरघोस निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे कोणत्याही दुर्धर आजारावर मात करण्यासाठी शासकीय योजनेच्या माध्यमातून सरकार आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिराच्या माध्यमातून सुमारे ७४१ लोकांनी लाभ घेतला. तसेच या शिबिरात सहभागी झालेल्या दहा लोकांना दुर्धर आजार असल्याचे समोर आले त्याच्यावर आ. अभिमन्यू पवार यांच्या सहकार्याने शासकीय योजनेतून लवकरच उपचार केले जाणार आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

संपादकीय....

धीरूभाईंच्या तिसऱ्या पिढीकडे रिलायन्सची सूत्रे

'करलो दुनिया मुठी में', असे रिलायन्स समूहाचे एक ब्रीदवाक्य आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्माला येऊनसुद्धा आपल्या ध्येयचिकाटीने देशातील उद्योगक्षेत्रात स्वत:ची वेगळी छाप निर्माण करणाऱ्या रिलायन्स समूहाच्या तिसऱ्या पिढीकडे आता उद्योग व्यवसाय वाढविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. धीरूभाईंचे मोठे पुत्र मुकेश अंबानी यांनी कंपनीच्या संचालक मंडळातून पायउतार होणार असल्याची माहिती देतानाच त्यांची मुले – ईशा, आकाश आणि अनंत अंबानी यांचा कंपनीच्या कार्यकारी संचालक मंडळात समावेश करण्यात आल्याची घोषणा केली. या खास क्षणी मुकेश अंबानी भावुक झाले होते. यावेळी त्यांना १९७७ मध्ये जेव्हा ते बोर्डात सामील झाले त्या दिवसाची आठवण झाली. जेव्हा माझ्या वडिलांनी मला रिलायन्सच्या संचालक मंडळात समाविष्ट केले होते, तेव्हा मी फक्त २० वर्षांचा होतो. आज ईशा, आकाश आणि अनंतमध्ये मला, मी आणि माझे वडील दिसत आहेत. या सर्वांमध्ये मला धीरूभाईंची ज्योत दिसते. माझ्या तीन मुलांनी धीरूभाईंची मानसिकता आत्मसात केली आहे आणि धीरूभाईंच्या उद्देश, तत्त्वज्ञान, उत्कटता आणि पायनियरिंग स्पिरिटसाठी ते वचनबद्ध आ–हेत, असे त्यांनी बोलून दाखवले.

धीरूभाई अंबानी यांनी आपल्या कष्टाने रिलायन्स उभी केली असली तरी मुकेश अंबानींच्या योगदानाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. २००२ मध्ये उद्योगपती–वडील धीरूभाई अंबानी यांच्या आकस्मिक निधनानंतर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सूत्रे हाती घेणारे मुकेश अंबानी यांना २१ वर्षे पूर्ण झाली आणि या काळात कंपनीच्या महसुलात वाढ झाली, तर नफा २० पटीने वाढला. आज रिलायन्स इंडस्ट्रीज केवळ पेट्रोलियमच्या जगातच नाही तर डिजिटल, मोबाइल, रिटेल आणि ग्रीन एनर्जीमध्येही आपले पाय पसरविले आहेत. त्याचे श्रेय मुकेश अंबानींना जाते. मुकेश अंबानी त्यांच्या कार्यकर्तृत्वाने रिलायन्सचा व्यवसाय सतत वाढवला. टेलिकम्युनिकेशनसोबतच रिलायन्स जिओमार्टच्या माध्यमातून रिटेल व्यवसायात वेगाने वर्चस्व निर्माण केले. रिलायन्सच्या जिओ प्लॅटफॉर्मवर जगातील मोठ्या कंपन्यांनी गुंतवणूक केली असून रिलायन्स आज पूर्णपणे कर्जमुक्त कंपनी आहे.

मागील दोन दशकांमध्ये रिलायन्सने अनेक नवीन व्यवसाय सुरू केल्याचे आपल्या पाहण्यात येतात. ज्यात रिलायन्सने २०१६ मध्ये जिओ सुरू केला आणि दोन वर्षांत ती भार–तातील टॉप तीन कंपन्यांपैकी एक बनली. मुकेश यांनी सूत्रे हाती घेतल्यावर रिलायन्सने २००६ मध्ये रिटेलमध्ये आणि २०२१ मध्ये नवीन ऊर्जा सुरू केली. रिलायन्स इंडस्ट्रीजने तेल शुद्धीकरणाची क्षमता दुप्पट केली आणि सर्वात वाईट कच्च्या तेलाचे निर्यातक्षम इंधनात रूपांतर करण्याची एक अद्वितीय क्षमता जोडली. यात जगातील काही सर्वात मोठी डाऊनस्ट्रीम युनिट्स देखील जोडली गेली. यादरम्यान रिलायन्सचा पेट्रोकेमिकल्सचा पारंपरिक व्यवसायही गेल्या दोन दशकांत अनेक पटींनी वाढला. याशिवाय त्यांच्या नेतृत्वाखाली फेसबुक, गुगल आणि बीपीसारख्या कंपन्यांनी रिलायन्समध्ये गुंतवणूक केली आहे. तेलापासून सुरुवात करून कंपनीने आजच्या काळात दूरसंचार आणि रिटेल क्षेत्रात प्रवेश केला आहे.

मुकेश अंबानी हे पहिले व्यक्ती आहेत ज्यांनी डेटाला 'न्यू–ऑइल' म्हटले आहे. ते इंधन तुमच्या आयुष्यात किती प्रमाणात शिरले आहे, हे आज आपण सर्वजण पाहत आ–होत. मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स जिओ–ने देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठ्या टेलिकॉम कंपन्यांमध्ये स्थान मिळवले आहे. जिओने डेटा क्षेत्रात मोठी क्रांती आणली असून पूर्वी २५० रुपये प्रति जीबी दरा–ने मिळणारा डेटा आता १० रुपयांवर आला आहे. फक्त किंमतच कमी झाली नाही, तर डेटा वापरातही वाढ झाली आहे आणि यात जिओचे मोठे योगदान आहे. त्यामुळे देश–विदेशात मुकेश अंबानी यांना कोणत्याही ओळखीची गरज नाही, असे वलय त्यांनी स्वत:च्या नावाभोवती केले आहे.

धीरूभाई अंबानी हयात असताना मुकेश अंबानी आणि अनिल अंबानी या भावांमध्ये जीवापाड प्रेम होते. ६ जुलै २००२ रोजी धीरूभाईंचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यानंतर दोन्ही भावांमध्ये वाद सुरू झाला. त्याचे कारण धीरूभाई यांनी आपल्या मागे कोणतेही मृत्यूपत्र ठेवले नव्ह–ते. मात्र आई कोकिलाबेन अंबानी यांनी दोन्ही भावांमध्ये व्यवसायाची वाटणी करून वाद मिटविला होता. संपत्ती वाटपात मोठा मुलगा मुकेशच्या पदरी पेट्रोकेमिकल्स, रिफायनिंग आणि टेक्स्टाईलसह तेल आणि वायू व्यवसाय आला, तर अनिल अंबानी यांना आर्थिक सेवा, ऊर्जा, मनोरंजन आणि दूरसंचार व्यवसायांची जबाबदारी देण्यात आली. मागील २१ वर्षांपासून मुकेश यशस्वीपणे रिलायन्सची सूत्रे सांभाळत आहेत.

मात्र जेव्हा वाटणी झाली, तेव्हा अधिक फायदेशीर असलेले व्यवसाय अनिल अंबानींना देण्यात आले होते. तरीही आज व्यावसायिक जगतात काहीतरी नवीन करण्याची जिद्द आणि कार्यक्षमता यामुळे मुकेश अंबानी यांनी आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्वत:ला सिद्ध केले आहे. २०१६ पर्यंत अंबानी ३८व्या क्रमांकावर होते आणि गेल्या दहा वर्षांपासून फोर्ब्स मॅगझिनच्या यादीत त्यांनी भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्थान मिळवले आहे. फोर्ब्सच्या जगातील सर्वात शक्तिशाली लोकांच्या यादीत ते एकमात्र भारतीय उद्योजक आहेत. जानेवारी २०१८ पर्यंत, मुकेश अंबानी यांना फोर्ब्सने जगातील १८व्या क्रमांकाची सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्थान दिले. मालमत्तेवरून भविष्यात अंबानी परिवारात वाद होऊ नये यासाठी मुकेश अंबानी यांनी विशेष काळजी घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांनी कंपनीची सूत्रे तीन मुलांकडे सोपवली आहेत.

सुशिक्षित महिला आणि अशिक्षित सासर

अजून एक समस्या सीमासमोर होती, ती म्हणजे तिचं राहणीमान, कपडे, फॅशन, ब्युटी पार्लरला जाणं हे घरातील सासू, मोठी जाऊ आणि नणंदेला पसंत नव्हतं. त्यांचं म्हणणं आम्ही कधी आयुष्यात असा वायफळ खर्च केला नाही, तोंडं रंगवली नाहीत, तुला बरं सुचतं हे सगळं. सीमाच्या सांगण्यानुसार तिला बाहेरच्या जगात वावरताना, चार चांगल्या लोकांमध्ये मिसाळताना निटनिटकं राहणं गरजेचे होतं. घरातील इतर महिलांना कधीही मोठे कार्यक्रम, मोठ्या मीटिंग, सभा, संमेलन इत्यादी ठिकाणी जाण्याची वेळच आली नाहीये. त्यामुळे त्यांना ब्युटी पार्लरला का जायचं याचं महत्त्वच पटत नाही. बाहेर वावरताना टापटीप का रा–हावं लागतं, कपड्यांना इस्त्री का असावी लागते, प्रसंगानुसार कपडे, स्टाईल थोडीफार फॅशन बदलावी लागते हे घरात कोणीही समजावून घेत नाही. रोजच साडी, मोठं मंगळसूत्र, हातभर बांगड्या आणि मोठी टिकली लावून मी सगळ्याच ठिकाणी नाही जाऊ शकत. पण सासू मात्र अपेक्षा करते की सीमाने रोज कायमस्वरूपी घरात आणि बाहेर देखील अशाच प्रकारे राहावं.

प्रत्येक घरातील गृहिणी जशी सर्व सौभाग्य अलंकार परिधान करते तसेच सीमाने वागावं. सीमाचं म्हणणं होतं मला टू व्हिलर चाल–वताना, बसने, ट्रेनने कामानिमित्त बाहेरगावी प्रवास करताना, धावपळ करताना आरामदायक कपडे बरे वाटतात. सासू म्हणते, आम्ही नववारी साडी घालून पण प्रवास केलेत आणि भाकऱ्या थापल्यात, शेतातील कामं पण साड्या घालूनच केलीत. तुझं भलतंच कौतुक आहे. सीमाला हे सगळं ॲडजेस्ट करणं अशक्य वाटतं होतं कारण आताच्या काळात, तिचं व्यावसायिक स्वरूप लक्षात घेता तिला असं राहणं आणि वावरणं अजिबात सूट होणारं नव्हतं.

कविता (काल्पनिक नाव) पण शिकलेली. गृहिणी म्हणून राहणारी, तीस वर्षीय महिला. कविताला होत असलेला एक मानसिक त्रासाचा मुद्दा होता तिचं आणि तिच्या नवऱ्याचं बाहेर फिरायला जाणं, हॉटेलिंग करणं तिच्या सासूला अजिबात पसंत नसायचं. सासू स्वत:च्या मुल–ाला याबाबत काही बोलायची नाही. पण कविताला मात्र तुझ्या मौज–मजेवर, तुझ्या बाहेर खाण्यावर किती पैसा खर्च होतो, तो जरी बाहेर जेवायला चल म्हटला तरी तुला नाही म्हणता येत नाही काय? सासूकडून अशी वक्तव्य ऐकल्यावर कविताला प्रचंड वाईट वाटायचं कारण ती पण चांगल्या घरातील मुलगी होती आणि तिच्या खाण्या–पिण्याच्या खर्चावरून तिला बोलणं तिच्यासाठी खूप अपमानास्पद होतं. घरात पण कविताने काही वेगळा, नवीन, चांगला पदार्थ बनवायला घेतला किंवा बाहेरून काही पार्सल मागवले की, काय चोचले चाल–लेत खाण्याचे म्हणून तिला सासूमार्फत ऐकवणूक केली जायची.

अशीच परिस्थिती होती राणी (काल्पनिक नाव)ची. इंजिनीरिंगची डिग्री घेतलेली राणी जेव्हा लग्नानंतर सासरी गेली, नोकरीला सुद्धा लागली तेव्हा सासरच्या लोकांनी मुद्दाम कामवाली काढून टाकली, असं तिचं म्हणणं होतं. अतिशय अशिक्षित सासू आणि अडाणी नणंद आहे त्यामुळे माझ्याशी असं वागल्या असं तिचं मत झालं होतं. आम्हाला तुझ्या करिअर वगैरेंचे काही कौतुक नाही, घरातली सगळी कामं करून जे करायचं ते कर असं तिला सांगण्यात आले होते आणि हे सगळं करताना

तिची खूप दमछाक होऊ लागली. दोन्ही आघाड्या सांभाळून जगणं तिच्या तब्बेतीला मानवणारं नव्हतं. नवऱ्यापुढे हा विषय मांडला असता, तो म्हणाला जमत नसेल तुला तर नोकरी सोडून दे, पण माझ्या आईने आयुष्यभर खूप कष्ट केलेत, तिला आता काम होत नाही, ती काहीही मदत करणार नाही. कामवाली फक्त माझं लग्न होईपर्यंत एक सोय म्हणून ठेवली होती. आता तू आहेस ना मग कामवालीची गरज नाही. राणीचं म्हणणं होतं मी अतिशय उत्कृष्ट गुण मिळवून उत्तम कॉलेजमधून इंजिनीअर झाले ते घरकाम करण्यासाठी नाही. माझ्या पालकांनी लाखो रुपये खर्च करून मला स्वत:च्या पायावर उभ केलं आहे, मला करिअर महत्त्वाचे आहे. त्यामुळे मला आता या लग्नात जमवून घेणं अशक्य आहे.

नंदा (काल्पनिक नाव) सामाजिक कार्यात अत्यंत रस असलेली. समाजासाठी झटून काम करणारी उच्चशिक्षित विवाहित स्त्री. लहानपणापासून माहेरी सामाजिक वाता–वरण असल्यामुळे तिच्या रक्तातच सामाजिक बांधिलकी आहे. नंदाच्या लग्नाला सुद्धा दहा–बारा वर्षे झालीत. पण आता तिला घरातील मागासलेल्या मनोवृत्तीचा, कमकुवत बुद्धिमत्ता असलेल्या अडाणी, अशिक्षित, घटस्फोटित नणंदेचा आणि प्रचंड जुन्या विचारसरणीची सासू यांचा भयानक त्रास होऊ लागला आहे, असं ती सांगत होती. तिच्या सामाजिक कार्यक्रमांवर, तिच्या समाजातील, घराबाहेरील विविध उपक्रमांवर या दोघीही सतत टीका करत. लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यापेक्षा स्वत:चं बघ, स्वत:च्या नवऱ्याकडे लक्ष दे, तुझ्या बाहेर राहण्यामुळे तुझ्या मुलांची जबाबदारी आमच्यावर पडते, त्याला वळण लावणं तुझीच जबाबदारी आहे. स्वत:चा संसार वाऱ्यावर टाकून कशाला बोंबलत लोकांना मदत करत फिरते, सामाजिक कार्य फुकटात करून कोणाचं भलं झालंय, चार पैसे कामविण्याची अक्कल नाही, कशाला नवऱ्याच्या जीवावर समाजसेविका बनते अशी निंदा आणि असभ्य भाषा तिला सतत ऐकावी लागत होती.

जे सामाजिक कार्य तिचं स्वप्न आहे, तिला त्यातून पुढे मोठं व्यक्तिमत्त्व बनायची इच्छा आहे. तिथेच तिला कोणताही पाठिंबा अथवा प्रोत्साहन न देता या दोघी सतत टोचून बोलतात. यामुळे नंदासुद्धा वेगळं होण्याच्या विचारात होती. मला माझ्या कामावरून अपमानित केलेले अजिबात सहन होत नाही, होणार नाही यावर नंदा ठाम होती. यासारखी अनेक उदाहरणे आपल्याला समाजात दिसतात. ज्यामुळे चांगल्या शिकलेल्या महिलांना त्यांच्या बौद्धिक पातळीनुसार सासर न मिळाल्यामुळे, वैचारिक, भावनिक, मानसिक पातळीत खूप तफावत निर्माण होते आणि संसार मोडकळीस येत आहेत. फक्त पती–पत्नीचं सुशिक्षित, डिग्र्या घेतलेले असून चालत नाही, तर संपूर्ण कुटुंब थोडेफार तरी शिकलेले असणे आज काळाची गरज बनत आहे.

जर तसं नसेल तर ज्यांना शिक्षणाची संधी मिळा–लेली नाही, जे जुन्या पिढीतील आहेत अथवा स्वत: अज्ञानामुळे शिक्षण सोडून दिलेले आहेत, परिस्थितीअभावी शिकू शकलेले नाहीत अथवा जे किमान पदवीधर पण झालेले नाहीत, अशा सासरच्या लोकांनी आपल्या उच्चशिक्षित सुनेसोबत जुळवून घेण्यासाठी आपली विचारसरणी, आपली वागणूक, आ–पले व्यक्तिमत्त्व, आपले स्वभाव बदलणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ आपल्या अडाणीपणामुळे, हेकेखोरपणामुळे, आपल्याला बाहेरील जगातील काहीही माहिती नसूनद–खील सुशिक्षित सुनांना केवळ मानसिक त्रास द्यायचा, कमी लेखायला म्हणून सासुरवास करायला जालं तर ऐका चांगल्या संसाराचा आपण स्वत: नाश करणार आहात हे लक्षात असू द्या

एकमेकांवर चिखल फेक

अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष व काँग्रेसचे पंतप्रधानपदाचे अघोषित उमेदवार खासदार राहुल गांधी यांनी लडाखच्या भूमीवर चीनच्या सैन्याने ताबा घेतला असल्याचे भाष्य करून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहेच. पण आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची बदनामी करीत आहोत याचे भानही त्यांचे सुटले आहे. राहुल गांधी मोदींवर आरोप करताना ते संयम बाळगत नाहीत. राहुल यांच्या आरोपाने भारतीय सैन्य दलाच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. राष्ट्रीय सुरक्षा, एकता, अखंडता याला आपण छेद देणारे वक्तव्य करीत आहोत, याचाही त्यांना विसर पडलेला दिसतो. काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून पंतप्रधान मोदींना त्यांचा विरोध असणे समजू शकते. तो त्यांच्या राजकारणाचा भाग असू शकतो. पण मोदींना विरोध करताना देशाची मान खाली जाईल, अशी वक्तव्ये करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण आहे. राहुल तरुण असले तरी त्यांचेही वय वाढत चालले आहे. राहुल गांधी जबाबदार व सशक्त नेता कधी बनणार, असा प्रश्न राजकीय वर्तुळात विचारला जातो आहे.

लडाखच्या जमिनीवर चिनी सैन्याने कब्जा केला आहे, असा राहुल गांधी यांनी जो दावा केला आहे, तो घाईघाईत केलेला दिसतो, एवढेच नव्हे तर कोणताही विचार न करता केलेला आहे, असे म्हणावे लागते. चीनने भारताचा हिस्सा असलेल्या लडाखच्या भूमीवर कब्जा केला हे त्यांना कसे कळले, त्याचा स्त्रोत काय आहे, त्यांना ही कोणी माहिती दिली? राहुल यांचा पंतप्रधानांवर विश्वास नाही, देशाच्या संरक्षण मंत्र्यांवर विश्वास नाही किंवा परराष्ट्र मंत्र्यांवरही विश्वास दिसत नाही. भारतीय सैन्य दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर किंवा निवृत्त वरिष्ठांवर त्यांचा विश्वास नाही हेच त्यांच्या वक्तव्यातून जाणवते.

दक्षिण ऑफ्रिकेत पंतप्रधान नरेंद्र मोदी व चीनचे अध्यक्ष झिंग जीपिंग हे एकमेकांना भेटत असताना राहुल यांनी चीनने लडाखची हजारो किमी भूमी बळकावली, असा आरोप करीत होते. यामागे त्यांचे काही निश्चितच गणित असावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीरपणे सांगतात की, भारताची एक इंचही जमीन कोणीही घेतलेली नाही. सन २०२० मध्ये झालेल्या गलवान धुमश्चक्रीनंतर पंतप्रधानांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीत, भारताची एक इंचही जमीन कोणीही घेतली नसल्याचे म्हटले होते. पण पंतप्रधान खोटे बोलतात, असा आरोप राहुल गांधी करतात, हे जास्त गंभीर व देशाला धोकादायक आहे. भारतीय सैन्याने कठोर प्रतिकार केल्यामुळे व दाखविलेल्या शौर्यामुळेच गलवान खोऱ्यातून चिनी सैन्याला माघार घ्यावी लागली, असे भाजपचे प्रवक्ते रवि शंकर प्रसाद यांनी त्याच वेळी स्पष्ट केले होते. तरीही चीनने भारताची भूमी बळकावली, असा अपप्रचार राहुल यांनी चालूच ठेवला आहे.

भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानव्याप्त काश्मीरवर सर्जिकल स्ट्राइक केला किंवा हवाई हल्ले केले होते, तेव्हाही त्यांनी प्रश्न उपस्थित करून पुरावे मागितले होते. भारतीय सैन्य दलाने केलेल्या कारवाईचे पुरावे मागणे म्हणजे त्यांच्या बेजबाबदारपणाचे वर्तन आहे. काँग्रेस पक्षातील ते आज सर्वोच्च नेते आहेत. त्यांनी संरक्षण किंवा परराष्ट्रविषयक मुद्द्यावर बोलताना अतिशय सा–वधपणे बोलणे अपेक्षित आहे. पण लडाखच्या भूमीवर चीनचा कब्जा, असा आरोप करणे म्हणजे निव्वळ उथळपणा आहे. भारताच्या सरहद्दीवर असलेली चीन व पाकिस्तान ही भारताची शत्रू राष्ट्रे आहेत. भारताच्या विरोधात त्या देशांना मदत होईल किंवा त्यांची प्रशंसा होईल, असे बोलणे कोणत्याही भारतीय नेत्याला शोभादायक नाही. चीनचा जो अजेंडा आहे, त्याला

पूरक अशी वक्तव्ये करणे देशाला धोकादायक आहे, याचे भान राहुल यांनी ठेवले पाहिजे. डोकलामचा वाद चालू असताना राहुल गांधी हे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाला न कळवता चिनी राजदूताला जाऊन भेटले होते. जेव्हा त्यांच्या मुलाखतीची जाहीर वाच्यता झाली, तेव्हा आपण वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी चिनी राजदूतांना भेटलो, असा खुलासा त्यांनी केला होता. देशाच्या सरहद्दीवर काय घडले, याची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी शत्रू राष्ट्राच्या राजदूताला भेटणे यापेक्षा बेजबाबदार वर्तन कोणते असू शकते?

काँग्रेस आज केंद्रात विरोधी पक्ष आहे. केवळ चार राज्यांत या पक्षाची सत्ता आहे. लोकसभेत विरोधी पक्ष म्हणून या पक्षाला अधिकृत मान्यता मिळविण्याइतपतही खासदार नाहीत. राज्यसभेत मात्र हा पक्ष मान्यताप्राप्त विरोधी पक्ष आहे. मग या पक्षाच्या सर्वोच्च नेत्याने जबाबदारीने बोलायला नको का? भार–ताची आंतरराष्ट्रीय पातळीवर अडचण होईल असे प्रश्न विचारून किंवा आरोप करून राहुल गांधी यांना काय साध्य करायचे आहे? राहुल गांधी यांना चीनला सहानुभूती मिळावी असे वाटते का? राजीव गांधी फाऊंडेशनला चीनकडून देणगी मिळविण्याची खरोखरच गरज पडली होती का? सन २००८ मध्ये बिजिंग दौऱ्यावर असताना सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी तेथे कम्युनिस्ट पक्षाबरोबर काय चर्चा केली? कोणते समझोते केले हे देशाला समजेल का?

जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधापदाच्या कारकिर्दीत चीनने तिबेटवर कब्जा केला आणि १९६२ ला भारतावर युद्ध लादून भारताचे मोठे नुकसान केले, याचा राहुल गांधी यांना विसर पडला का? नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाल्यापासून चीन–लाच काय पण कोणत्याही देशाला भारताकडे वाकड्या नजरने बघण्याची हिम्मत झालेली नाही. चीनला वेळोवेळी त्याची जागा दाखवून देण्याचे काम भारताने केले आहे. एकीकडे नरेंद्र मोदी यांची जगात विश्वनेता म्हणून प्रतिमा निर्माण झाली असताना व ते ब्रिक्स परिषदेत चीनच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर चर्चा करीत असताना चीनने भारताच्या लडाख प्रांताची जमीन हडप केली, अशी आवई राहुल यांनी उठवणे यामागे त्यांची व काँग्रेस पक्षाची कोणती कुटनिती आहे? देशाची जनता नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यातील फरक चांगला जाणून आहे. चीन किंवा पाकिस्तानला ऊर्जा मिळेल अशी वक्तव्ये करून मोदींना प्रश्न विच–ारणे किंवा आरोप करणे वा पुरावे मागणे यातून देशाची बदनामी होत असते हे राहुल यांना समजत नसावे का? गलवान खोऱ्यात भारतीय सैन्य व चिनी सैनिकांत झालेल्या धुमश्चक्रीबाबत राहुल यांनी ज्या पद्धतीने प्रश्न विचारले ते आपल्या सैन्याच्या शौर्यावर आणि बलिद–ानावर संशय घेणारे होते.

आंतरराष्ट्रीय प्रश्न पंतप्रधान मोदींनी अत्यंत मुत्सद्दी–पणे हाताळले आहेत. दुसरीकडे राहुल गांधी यांचा त्यात उथळपणा जगापुढे प्रदर्शित झाला आहे. राहुल गांधी यांच्या मनात मोदी, अमित शहा, भाजप, संघ परिवार यांच्याविषयी द्वेष आहे. त्यांच्या आरोपातून आणि वक्तव्यातून तो वेळोवेळी प्रकट होतो आहे. राहुल यांच्या आरोपांनी मोदी यांच्या जागतिक प्रतिमेवर काहीही परिणाम होणार नाही, उलट ते किती अपरिपक्व नेते आहेत, हेच जगापुढे येत आहे. राहुल गांधी आणि सोनिया गांधी हे पक्षाच्या कोणत्याच पदांवर नाहीत. पण कोणतेही पद नसताना पक्ष संघटनेची सूत्रे ही त्यांच्या हाती आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे जरी असले तरी सोनिया व राहुल यांनी हिरवा झेंडा दाखविल्याशिवाय ते कोणताच महत्त्वाचा निर्णय जाहीर करू शकत नाहीत. गांधी परिवाराशिवाय पक्ष चालू शकत नाही, ही काँग्रेस पक्षाची असहाय्यता आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार कमजोर व्हावे आणि मोदी यांच्या जागतिक प्रतिमेला तडे जावेत, असा काँग्रेसकडून वारंवार प्रयत्न होत असतो. पण त्यात काँग्रेस आणि राहुल गांधी हेच उघडे पडतात हे वेळोवेळी दिसून येते. मोदी सरकारने गेल्या साडेनऊ वर्षांत जे चांगले काम केले, ते काँग्रेसला दिसत नाही. देशात सर्वच वाईट चालले आहे, देशात सर्वत्र अंधार आहे, असे समजून काँग्रेस पक्ष नरेंद्र मोदींना, त्यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला व भाजपला विरोध करीत आहे.

'या' आजारातून बरं होण्यासाठी विजेचे झटके द्यावे लागतात का?

मंगल गेले अनेक दिवस कोणाशी काही बोलतच नव्हती. समोर कुठेतरी नजर लावून बसे. तासन तास एके ठिकाणी उभी राही, हलवले तरी जागेवरून हलत नसे. अंघोळ, जेवण हे सगळे तर सोडलेच होते. हात धरावा तर त्यात एक ताठरपणा जाणवे. तसा तिचा मानसिक आजार सुरू होऊन २ वर्षे झाली होती. स्किझोफ्रेनियाचे निदान झाले होते. गेले ३ महिने औषधे बंद होती. डॉक्टर म्हणले तिला 'उरींरींपळर' झाला आहे, म्हणजे चलनवलनाच्या अनियमितपणाच्या लक्षणांचा सामुचय. स्किझोफ्रेनियाचे हे एक लक्षण असू शकते. डॉक्टर म्हणले, 'ईसीटी द्यावे लागतील.' मंगलचा भाऊ गडबडला, 'म्हणजे विजेचे झटके ना? अरे बाप रे!'

गेले तीन महिने सुरेश स्वतःशीच झगडत होता. मनात सतत नकारात्मक विचार यायचे. दिवसभर उदास वाटायचे. कित्येक दिवसात ऑफिसला गेला नव्हता तो. झोप उडालीच होती. धड खाणेपिणे नाही, स्वतःची काही काळजी घेणे नाही, कसे तरी चुरगळलेले कपडे घातलेले. निराश होऊन घरात एका कोपऱ्यात बसून राहायचा. गेले पंधरा दिवस सतत त्याला सारखा एकाच विचार मनात यायचा, ' कशाला जगायचे? आयुष्यात काही चांगले कधी घडणारच नाही. मझ्या जगण्याला आता काही अर्थ राहिला नाही. त्यापेक्षा मरून जावे.' त्याची पत्नी फार काळजीत होती. मनोविकारतज्ज्ञांकडे(ींलिहळरींळीं) घेऊन गेली. त्यांनी निदान केले, 'उदासपणा'(वशींशीीळेप). सुरेशच्या मनात सारखे येणारे आत्महत्त्येचे विचार, त्याचे स्वतःकडे अजिबात लक्ष नसणे हे पाहून त्यांनी ईसीटी द्यावे असे सुचवले. सुरेशच्या पत्नीने विचारले,'वाचेल ना सुरेश?' असे अनेक प्रश्न ई. सी. टी. च्या बद्दल सगळ्यांच्याच मनात असतात. ईसीटी म्हणजे एश्रशलींीलेपींीश्रीळींश ढहशीरू. थोडक्यात विजेच्या सहाय्याने मेंदूला एक झटका देणे. कसा देतात तो? किती मोठा विजेचा प्रवाह (लींीीशपीं) वापरला जातो? किती धोकादायक आहे ही पद्धत?

सगळ्यात प्रथम हे जाणून घेऊ की ई. सी. टी. ही उपचार पद्धत विविध प्रयोगांमधून सिद्ध झालेली आहे. १९३८ सालापासून अस्तित्वात असलेली आणि अधिकाधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने विकसित झालेली अशी ही उपचार पद्धत आहे. आत्ताच्या आधुनिक उपचारपद्धतीमध्ये विजेचा प्रवाह किती असावा, किती वेळ दिलं जावा, विजेचा दाब (ींश्रींरसश) किती असावा इत्यादी अनेक गोष्टींची परिमाणे ठरलेली आहेत आणि त्यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध आहेत. इतकेच नाही तर कायद्याने देखील याचे काही नियम घालून दिले आहेत.

ईसीटी ही प्रक्रिया एखाद्या शस्त्रक्रियेसारखी (ीीसशीू) असते. शस्त्रक्रियेआधी जशी भूल (रपशींींहशीळर) दिली जाते, तशीच ईसीटी आधी दिली जाते. पेशंट, नातेवाईक यांच्या संमतीखेरीज ईसीटी देता येत नाहीत. लिखित स्वरूपात, माहितीपूर्ण अनुमती घेतली जाते.(ुळींींशप ळपषीीशव लेपीशपीं). अतिशय थोडा विजेचा प्रवाह, म्हणजे आपल्या रोजच्या वापरातल्या विजेच्या एक पंचमांश(१/५ लींीीशपीं), विजेचा दाब एक चतुर्थांश(ः ींश्रींरसश), इतकाच दिला जातो आणि तो ही केवळ एक दशांश सेकंद(१०० ीशल, १/१० ीशलेपव) ते जास्तीत जास्त ४-८ सेकंद दिला जातो. अत्यंत नियंत्रित स्वरूपात, भूल्ताज्ज्ञांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली जाते.

ईसीटी सुरू करण्यापूर्वी सर्व शारीरिक तपासण्या कराव्या लागतात. साधारणतः ६,८, १० किंवा पेशंटच्या लक्षणांच्या तीव्रतेनुसार, होणाऱ्या सुधारणेनुसार आवश्यक तेवढे ईसीटी दिले जातात. आत्महत्येचे सतत विचार येणे, खाणे पिणे इत्यादी गोष्टींकडे सलग काही काळ दुर्लक्ष असणे, लरींरींपळर, उद- ासपणाची अतिशय तीव्र लक्षणे, औषधांना पुरेसा प्रतिसाद नसणे अशा अनेक कारणांनी ईसीटी दिले जातात. लहान मुलांना १८ वयापर्यंत ईसीटी द्यायला कायद्याची अनुमती नाही. परंतु वृद्धांमध्ये ईसीटी दिले जाऊ शकतात.

ईसीटीच्या सहाय्याने वेगाने सुधारणा होते. ईसीटी कसे काम करतात यासंबंधीही बरेच संशोधन झाले आहे. मेंदूचा रक्तप्रवाह, साखरेचा आणि ऑक्सिजनचा मेंदूतील वापर ईसीटीच्या काळात वाढतो आणि मग कमी होतो. तसेच विविध रासायनिक बदल होतात, मेंदूतील रासायनिक असंतुलन कमी केले जाते.

ईसीटीचे दुष्परिणाम कमी आहेत आणि तात्पुरते असतात. काही काळ डोके दुखणे, एखादे वेळेस गोंधळून जाणे(वशश्रळीळीं), स्मरणशक्तीवर परिणाम हे काही सर्वसाधारण दुष्परिणाम आहेत. अतिशय सुरक्षित अशी ही उपचार पद्धती आहे. ईसीटीविषयी पुरेशी आणि वैज्ञानिक माहिती असेल तर रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक या उपचाराचा खरा लाभ घेतात.

ईसीटी ही प्रक्रिया एखाद्या शस्त्रक्रियेसारखी आहे. त्याच्यापेक्षा सोप्या पद्धतीने चेतासंस्थेला उद्दीपित करण्याची पद्धत शोधून काढण्याचा गेली अनेक वर्षे प्रयत्न सुरू आहे. आता आणखी काही नवीन उपचार पद्धती विकसित झाल्या आहेत आणि त्यांचा मर्यादित स्वरूपात उपयोग केला जात आहे.

त्यातली एक उपचार पद्धती म्हणजे ढीरपीलीरपळरश्र ारस- पशींळल ीींळींश्ररींळेप, म्हणजे मेंदूचे चुंबकीय उत्तेजन. यात सतत बदलणारे चुंबकीय क्षेत्र डोक्याला लावलेल्या एका यंत्रातून निर्माण केले जाते. यामुळे छोटे छोटे अनेक विजेचे प्रवाह तयार होतात ज्यातून चेतापेशींचे वेगवेगळे विभाग (लळीर्लीळीं) उद्दीपित होतात. यातून मेंदूतील कमी कार्यशील भाग उद्दीपित होतात आणि लक्षणांमध्ये सुधारणा होते. उदासपणा, सतत येणारे आत्महत्त्येचे विचार, उपचारांना प्रतिसाद न देणारे भास, काही अतिचिंतेचे विकार अशा विविध विकारांवर या उपचारपद्धतीचा वापर सुरू झाला आहे. तसेच या सर्वांसाठी अधिकाधिक शास्त्रीय पुरावे गोळा करणेही सुरू आहे.

फिट येण्याची शक्यता हा मुख्य दुष्परिणाम या प्रक्रियेमध्ये आहे. अशीच आणखी एक उपचार पद्धत गेल्या काही वर्षांत विकसित झाली आहे- ढीरपीलीरपळरश्र उळीशलीं उींीशपीं डींळीश्ररींळेप. यामध्ये अतिशय कमी (१-३ ा-) असा विजेचा प्रवाह डोक्याला बाहेरून दिला जातो. यामुळे चेतापेशींच्या ध्रुवीकरणात (श्रिरीळूरींळेप) बदल होतो त्यामुळे चेतापेशींच्या कार्यावर परिणाम होऊन पेशंटच्या लक्षणात सुधारणा होते. उद- ासपणा, उपचारांना प्रतिसाद न देणारे भास, दारू आणि तंबाखूचे व्यसन, मंत्रचळ(लीशींीळींश लेर्ाींश्रीळींश वळींवशी) अशा मानसिक विकारांवर हा उपचार वापरला जाऊ लागला आहे. डिमेन्शियामध्येसुद्धा याचा वापर केला गेला आहे.

छोटे उपकरण आणि स्वस्त उपाय असा हा उपचार आहे, हा त्याचा फायदा. अशा प्रकारे मनोविकारांवर परिणामकारक आणि सुरक्षित असे उपाय शोधण्याचा, वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध करण्याचा आणि मगच उपयोगात आणण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. या सगळ्याचा रुग्णांना नक्कीच लाभ होईल अशी खात्री आहे.

बाभळगाव येथे महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीची ग्रामसभेत बिनवीरोध निवड

लातूर / प्रतिनिधी :- लातूर तालुक्यातील बाभळगाव ग्रामपंचायतची ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यामध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गावसमिती अध्यक्षपदी जीवन गुंडेराव देशमुख व उपाध्यक्षपदी अकबर शेख, मुरलीधर मस्के, विल्सन मस्के यांची बिनवीरोध निवड करण्यात आली. महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान हे गावातील लोकांना आपसातील भांडणापासून व पर्यायाने गुन्ह्यांपासून परावृत्त करणे यासाठी अस्तित्वात आले आहे. काही कारणाने वाद झाल्यास तंटामुक्त गाव समितीने वाद सामोपचाराने सोडवायचे असे याचे प्राथमिक स्वरूप आहे. ही संकल्पना महात्मा गांधीजींच्या विचारांवर आधार- लेली आहे. महात्मा गांधींना अभिप्रेत असलेल्या ग्रामस्वराज्य या संकल्पनेवर तंटामुक्ती ग्राम ही संकल्पना उभी आहे. गावाचा विकास गावातच झाला पाहिजे तसेच त्या त्या गावातील

प्रश्न देखील त्याच ठिकाणी सोडवता आले पाहिजेत यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब आणि ग्रामविकास मंत्री आर. आर. पाटील यांनी या योजनेला खऱ्या अर्थाने न्याय दिला.

या अनुषंगाने बाभळगाव ग्रामपंचायतची ग्रामसभा झाली यामध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गावसमिती अध्यक्षपदी जीवन गुंडेराव देशमुख व उपाध्यक्षपदी अकबर शेख, मुरलीधर मस्के, विल्सन मस्के यांची बिनवीरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच प्रिया मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, पोलीस पाटील

मुक्ताराम पिटले, सदस्‍ अनील मर्के, नवनाथ मस्के, कैलास मस्के यांच्यासह बंदे नवाज सय्यद, साधूराम मस्के आदी नागरीक उपस्थित होते.

पहिल्या तिमाहीत जीडीपी ७.८ टक्के

नवी दिल्ली : भारतासाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर आली असून भारता- ची अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. केंद्र सरकारने गुरुवारी आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या पहिल्या तिमाहीची आकडेवारी जाहीर केली आहे. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था ७.८ टक्के दराने वाढली आहे. म्हणजेच, भारताचा विकास दर ७.८ टक्क्यांवर पो- होचला आहे. जगातील कोणत्याही मोठ्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत हा सर्वात वेगवान विकास दर आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) गुरुवारी संध्याकाळी पहिल्या तिमाहीतील जीडीपीची (जीडीपी) आकडेवारी जाहीर केली आहे. सरकारी खर्चाचा वेग, ग्राहकांची मजबूत मागणी आणि सेवा क्षेत्राची चांगली कामगिरी या घटकांमुळे पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेला मदत झाली. आकडेवारीनुसार, जून तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ गेल्या चार तिमाहीत सर्वात वेगवान राहिली आहे. जून तिमाहीत जीडीपी वाढ ७.८ टक्क्यांवर पोहोचली आहे.

यापूर्वी मार्च तिमाहीत विकास दर ६.१ टक्क्यांच्या पातळीवर होता. डिसेंबर तिमाहीत जीडीपी ४.५ टक्के वेगाने वाढला. जून तिमाहीत कृषी क्षेत्राने सर्वोत्तम कामगिरी केली आहे. कृषी क्षेत्रा- ने ३.५ टक्के वाढ नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या याच तिमाहीत कृषी क्षेत्राची वाढ २.४ टक्के होती. मात्र, या तिमाहीत उत्पादन क्षेत्राचा विकास घसरला असून तो ४.७ टक्क्यांवर घसरला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला याच कालावधीत तो ६.१ टक्के होता.

इंदापूर, चिपळूण, संगमेश्वर तालुक्यातील पर्यटनक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी देणार - मा. अजितदादा पवार

मुंबई / प्रतिनिधी: पुणे जिल्ह्याच्या इंदापूर येथील माल- ोजीराजे भोसले यांची गढी, हजरत चाँदशाहवली बाबांचा दरगाह, रत्नागिरी जिल्ह्याच्या संगमेश्वर तालुक्यातील कसबा येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक, श्री. मार्लेश्वर देवस्थान आदी क्षेत्रांना ऐतिहासिक, आध्यात्मिक, पुरातत्वीय वारसा आहे. या क्षेत्रांचा विकास करताना पुरा- तत्वीय महत्व, ऐतिहासिक सौंदर्य जपण्यात यावे,नवीन बांधकाम करताना ते शेकडो वर्षांपूर्वीच्या मूळ वास्तूशी मिळते-जुळते असावे , अशा सूचना करत इंदापूर, चिपळूण, संगमेश्वर तालुक्यातील पर्यटनक्षेत्रांचा परिपूर्ण आराखडा सबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी तयार करून तो सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांनी दिले. दरम्यान या विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही. आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करण्यात येईल असे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथील बैठकीत आश्वस्त केले.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत पुणे जिल्ह्याच्या इंदापूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण आणि संगमेश्वर तालुक्यातील ऐतिहासिक स्थळे, देवस्थ- ाने आणि पर्यटनक्षेत्रांच्या विकासासंदर्भात उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आज संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

इंदापूर शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांच्या गढीचे संवर्धन करुन जुने बुरुज, गाव वेसेसह ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करण्याबरोबरच गढीलगत असणाऱ्या हजरत चाँदशाहवली बाबांच्या दर्गा परिसराचा विकास करण्याचा प्रस्ताव पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने सादर करावा. यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यात येईल. ही विकासकामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करण्याची खबरदारी घ्यावी. विकासकामे करताना त्या परिसराचा, वास्तूचा ऐतिहासिक, पुरातत्व महत्व जपले जावे, याची काळजी घ्यावी. गढीच्या परिसरात अतिक्रमणे असल्यास ती तातडीने हटविण्याची कारवाई करण्याची सूचनाही अजितदादांनी केली. कोकणाला निसर्गाचे वरदान लाभले आहे. त्यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून या परिसरात रोजगार निर्मिती करण्यास मोठा वाव आहे. त्याचा विचार करुनच कोकणातल्या पर्यटनस्थळांचा विकास करावा. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत चिपळूण तालुक्यातील पेढे येथील सवतसडा धबधबा, चिपळूण गुह- ागर बायपास रोडवरील पुरातन बौद्ध लेणी (दगोबाची लेणी) सुशोभीकरण करणे, संगमेश्वर तालुक्यातील मार्लेश्वर देवस्थान परिसर, कसबा येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक, श्री. टिकलेश्वर मंदिर, श्री. क्षेत्र मार्लेश्वर येथे आर्च ब्रिज बांधणे, सुशोभीकरण करणे ही कामे करण्याबाबत वास्तुविशारदांची नेमणूक करण्यात यावी. पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा देण्याबरोबरच त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याच्या सूचना अजितदादा पवार यांनी केल्या.

या बैठकीला माजी राज्यमंत्री आमदार दत्तात्रय भरणे, आमदार शेखर निकम, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महसूल विभागाचे मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. एच. गोविंदराज, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, दूरदृश्यप्रणालीद्वारे पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. एस. चव्हाण, नगरपालिका इंदापूरचे मुख्याधिकारी राम कापरे, वास्तुविशारद स्मिता तावरे, रत्नागिरीचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल ओटवणेकर, इंदापूर येथील बाळासाहेब ढवळे, भारत जामदार, आजद पठाण, ओमकार साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.

मानवाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी पाच प्रकारचे धन आवश्यक-भदंत पय्यानंद स्थवीर.

महाविहार, सातकर्णी नगर येथे श्रावण निज पौर्णिमा संपन्न.

लातूर दि. ३१ :-समस्त विश्वातील मानवाच्या सर्वांगीण कल्याणासाठी, उन्नतीसाठी भगवान बुध्दानी ८४००० प्रवचनाद्वारे उपदेश केला आहे, त्यामध्ये प्रामुख्याने पाच प्रकारचे धन आवश्यक असल्याचे सांगितले आहे, ते म्हणजे श्रद्धा धन, शील धन, श्रुत धन, त्याग धन, प्रज्ञाधन या मानवी सद्गुणाचे धन आपल्या अंगी निर्माण करणे आवश्यक आहे तसेच अध्यात्मिक सद्गुणरुपी धनाची मानवास गरज असल्याचे प्रतिपादन भदंत पय्यानंद स्थवीर यांनी केले.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर द्वारा आयोजित श्रावण निज पौर्णिमेनिमित्त परित्राणपाठ मंगल मैत्री, त्रिसरण अष्टशील ग्रहण व सामुदायिक बुद्ध वंदना व उपस्थित मान्यवरांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भदंत पय्यानंद स्थवीर व उपस्थित उपासक उपासिकांच्या हस्ते बोधी वृक्षाचे पूजन करण्यात आले तदनंतर बोधिवृक्षापासून महाविहार पर्यंत स्तूप मिरवणूक काढण्यात आली. त्रिसरण अष्टशील ग्रहण व सामुदायिक बुद्ध वंदनेनंतर प्रा. देवदत्त सावंत व प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांचा अनुक्रमे सत्यशोधक राष्ट्रीय आदर्श पुरस्कार, छत्रपती शिवराय विचार प्रेरणा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच दलित पँथर चळवळीमध्ये जीवन समर्पित करणारे पँथर गोरोबा काका सूर्यवंशी व पँथर साहेब अली सौदागर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. धार्मिक चळवळीत आपले मौलिक योगदान दिल्याबद्दल हरिश्चंद्र सूर्यवंशी तसेच कॅमेरा मनराज धायगुडे, विश्वनाथ आल्टे यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डी. एस. नरसिंगे सर यांच्या सत्कार नंतर प्रमुख पाहुण्यांची मनोगते झाली.

यावेळी पुढे बोलताना भदंत पय्यानंद स्थवीर म्हणाले की, आपल्या मार्गदात्याप्रती, उद्धारकर्त्याप्रती डोळस श्रद्धा, विश्वास असावी. आपण भगवान बुद्धांना डोळस श्रद्धेने कसे पाहावे हे अत्यंत आवश्यक आहे. या प्रसंगी श्रद्धा व अंधश्रद्धेचे खूप मार्मिक, मौलिक, विश्लेषण करताना भगवान बुद्ध सर्वोत्तम ज्ञानाचे भांडार असून बुद्धांनी सांगितलेला सधम्म समस्त विश्वातील मानवांनी आचरणात आणण्याची गरज असल्याचे प्रतिपादन भंतेजीनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे सर यांनी केले तर आभार पांडुरंग अंबुलगेकर यांनी मानले.

सांडपाणी रस्त्यावर वाहून दुर्गंधी व घाणी मुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात. घणसोली 'एफ' विभागाचे दुर्लक्ष.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- निश्चय केला, नंबर पहिला हे ब्रीद वाक्य असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता सर्वेक्षण चालू असताना रबाळे (एमआयडीसी) येथील सविता माई आंबेडकर, निब्बान टेकडी शाळेसमोर रस्त्याच्या मधोमध असलेल्या चेंबर मधून घाणीचे सांडपाणी वाहत असते. ऐन सणासुदीच्या काळात स्थानिक रहिवासी, पदचारी, नोकरदार, विद्यार्थी सर्वांना त्रास होत आहे.

सांडपाणी वाहून सर्वत्र दुर्गंधी पसरत आहे, यातून पावसाळ्याच्या काळात डेंग्यू ,मलेरिया, हिवताप, लेप्टोस्पायरसीस सारखे घातक रोग देखील तोंड वर काढू शकतात. येथील लोकप्रतिनिधी ही याबाबतीत उदासीन दिसून येत असल्याचे निदर्शनात येत आहे तसेच महानगरपालिकेच्या वतीने घनसोली 'एफ' विभागातर्फे ही समस्या सोडविली जाणे अपेक्षित आहे. परंतु घणसोली वार्ड अधिकारी जाणून-बुजून या गोष्टीकडे कानाडोळा करीत आहेत की काय ? असा संतप्त सवाल येथील नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

३० सप्टेंबर २०२३ पर्यंत सर्व कराचा भरणा करणा-या मालमत्ता धारकांस चालू अर्थिक वर्षातील मालमत्ता,करामध्येस ३ % सुट....

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ताधारकांना कळविण्यात येते की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ अन्वये सुट देण्याचे अधिकार असून ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत सर्व कराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकांस चालू अर्थिक वर्षातील फक्त मालमत्ताकरामध्ये (सामान्यकरामध्ये) ३ % सुट देण्यात येत आहे.तरी उक्त देण्यात आलेल्या सुटचा लाभ घेवुन मालमत्ताधारकांनी आपल्याकडील देय असलेल्या कराचा भरणा https:// propertytax. mclatur.in या वेबसाईटवर ऑन लाईन करावा.किंवा गुगल प्ले स्टोअर वर Latur property tax या ऑपवर करावा.किंवा Indian Bank -ccount No.7472770211 IFSC Code IDIB000L535 Branch Code No.6389 या खातेक्रमांकावर आरटीजीएस,युपीआय व डिबेटकार्ड या द्वारे किंवा आपणाकडे येणा-या वसूली लिपीकाकडे व जवळील क्षेत्रीय कार्यालयात भरणा करून वरील देण्यात आलेल्या योजनेचा लाभ घेवुन लातूर शहर महानगरपालिकेस सहकार्य करावे हि विनंती.

बिटरगांव येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

रेणापूर / प्रतिनिधी :-साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बिटरगाव येथे बिसेफ टीम द्वारे १०३ व्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन नववे पुष्प आयोजन करण्यात करण्यात आले होते सर्व प्रथम याप्रसंगी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले, व साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे समाज मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच महेंद्र पाटील हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून अँड. दीपक साठे, अण्णा नरसिंगे व नवनाथ वाघमारे या ठिकाणी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन नंदू राऊत यांनी केले. या जयंतीचे उपक्रम म्हणून साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या फोटो प्रत्येक घरी भेट देण्यात आल्या. तसेच नवनाथ वाघमारे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक कादंबऱ्या या ठिकाणी जयंती कोअर कमिटीला भेट दिल्या त्यामध्ये अहंकार, निखारा, चिरागनगरची भूत, फकीरा या कादंबऱ्या या जयंती समितीला भेट दिल्या.

या ठिकाणी उपस्थित दयानंद राऊत, रामभाऊ ऊपाडे,राम रूपा राऊत, अक्षय बाबुराव उपाडे, विकास उपाडे, विकास राऊत, रवी उपाडे, अजय उपाडे, अक्षय महादेव उपाडे, सचिन उपाडे, शरद उपाडे, नंदू राऊत, बाबू उपाडे, नागनाथ राऊत, कृष्णा मधूकर उपाडे यांची उपस्थिती लाभली होती. अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात हा कार्यक्रम या ठिकाणी संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेच्या जिल्हाअध्यक्षपदी भीमाशंकर बेरूळे, कार्याध्यक्षपदी रामेश्वर गोरे, तर सचिव पदी कुलदीप देशमुख यांची सर्वानुमते निवड

लातूर :- दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ५.३० वा. लातूर जिल्ह्यातील तहसीलदार व नायब तहसीलदार यांची कार्यकारणी फेरबदल व निवडीबाबत राज्य संघटनेचे कार्य अध्यक्ष सुरेश बगळे यांच्या आदेशान्वये रामेश्वर वसंतराव गोरे, तहसिलदार तहसिल कार्यालय, उदगीर तथा निरीक्षक, जिल्हा लातूर यांचे अध्यक्षतेखाली सदर बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीला भरत सूर्यवंशी, काशिनाथ पाटील, रेणुकादास देवणीकर, श्रीमती रोहिणी मोरे तहसीलदार, आणि रामेश्वर वसंतराव गोरे, तहसिलदार तथा निरीक्षक तातूर, यांचे उपस्थितीत बैठक सुरू करण्यात आली त्यावेळी कुलदीप देशमुख यांनी बैठकीच्या अनुषंगाने प्रस्तावना केली, श्री रामेश्वर वसंतराव गोरे तहसीलदार उदगीर यांना, अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात येऊन त्यांना मार्गदर्शन करणे बाबत सर्वप्रथम विनती करण्यात आली. मा. श्री रामेश्वर वसंतराव गोरे, अध्यक्ष यांनी सर्व उपस्थित तहसीलदार व नायब तहसीलदार यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी संघटनेचे कामकाज कसे करावे व कोणकोणत्या गोष्टी संघटनेचे काम करताना केल्या पाहिजेत आणि अधिकारी याना काही अडचणी आल्यास त्यासाठी कसे तत्परतेने काम केले पाहिजे याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. संघटनेमध्ये इतर संघटनेतील अन्य सदस्य स्वतः होऊन संघटनेसाठी काम करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी पुढे यावे व त्यांनी त्यांची इच्छा व्यक्त करावी. त्याअनुषंगाने जे अधिकारी संघटनेत काम करण्यास इच्छुक असतील त्याबाबत सर्व समक्ष विचारविनिमय करून लोकशाही मार्गाने संघटनेचे पदाधिकारी निवडी बाबत कार्यवाही करण्यात येईल, असे रामेश्वर वसंतराव गोरे, अध्यक्ष यानी विस्तृत मार्गदर्शन केले.

तसेच नायब तहसीलदार यांचे ग्रेड पे बाबत बैठकीत चर्चा करण्यात आली, त्यामध्ये विहीत मुदतीत ग्रेड-पे मंजूर न झाल्यास आंदोलनाची दिशा ठरविण्याबाबत विचार विनिमय

करण्यात आता. तसेच झच् घळीरपबाबत फक्त डरपव ड्शशवळपस चे काम व महसूल निगडीतच काम करण्याचे ठरवून त्या प्रकारचे निवेदन जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास देण्याचे ठरवण्यात आले. तसेच ३० वर्ष सेवा झालेल्या अधिकारी यांना तिस-या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळावा व ५०, ५५ वर्ष पुर्ण झालेल्या अधिकारी यांचे वयाचे सेवापुनर्विलोकन झालेले नसल्याने याबाबत निवेदन देणे आणि मासीक बैठक घेणे बाबत दिनांक,वेळ ठरविणेबाबत चर्चा करण्यात आली. तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी सदस्याची वार्षीक वर्गणी भरून घेऊन तसेच सदस्यांची नोंदनी करून संघटनेला बळकट करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानंतर बैठकीमध्ये सर्वानुमते खालील प्रमाणे अधिकारी यांची लोकशाही पध्दतीने पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली. जिल्हाअध्यक्ष भिमाशंकर बेरुळे, नायब तहसीलदार, तहसिल, लातूर उपाध्यक्ष गणेश सरोदे, नायब तहसिलदार, तातूर, कार्याध्यक्ष रामेश्वर गोरे, तहसीलदार, उदगीर, सचिव कुलदीप देशमुख, नायब तहसीलदार, तहसिल, लातूर,

कोषाध्यक्ष काशिनाथ पाटील, तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, प्रसिद्धी प्रमुख राहूल पत्रिके, नायब तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, सहसचिव रेणुकादास देवणीकर, तहसीलदार, चाकूर, सुरेश पाटील, नायब तहसिलदार, तहसिल ओसा, सल्लागार विजयकुमार ढगे, श्रीमती अहिल्या गाठाळ, श्रीमती संगीता टकले, श्रीमती प्रियंका कांबळे आपरे नितीन वाघमारे सर्व उपविभागीय अधिकारी व सर्व उपजिल्हाधिकारी जिल्हा लातूर, उपाध्यक्ष लातूर उपविभाग सुधीर देशमुख, नायब तहसीलदार, उपविभाग, लातूर, उपाध्यक्ष निलंगा उपविभाग श्री. प्रविण आळंदकर, नायब तहसीलदार, तहसिल निलंगा, उपाध्यक्ष उदगीर उपविभाग संतोष धाराशिवकर, नायब तहसीलदार, तहसिल उदगीर, उपाध्यक्ष ओसा रेणापुर उपविभाग श्रवण उगले , नायब तहसीलदार, तहसिल रेणापूर, उपाध्यक्ष अहमदपुर उपविभाग डी. पी. स्वामी, नायब तहसीलदार, तहसिल , चाकूर, संघटक- सुधीर बिराजदार, नायब तहसीलदार, तहसिल, शिरुर अनंतपाळ, संतोष गुट्टे, नायब तहसीलदार, तहसिल, जळकोट, महिला संघटक श्रीमती धम्मप्रिया गायकवाड, तहसीलदार, रेणापूर, श्रीमती परवीन पठाण, नायब तहसीलदार, जि.का. लातूर, मार्गदर्शक भरत सुर्यवंशी, तहसिलदार, औसा,

श्रीमती उषाकिरण श्रंगारे, तहसिलदार, निलंगा,श्रीमती सुरेखा स्वामी तहसिलदार, जळकोट, शिवाजी पालेपाड, तहसिलदार, अहमदपूर, या सर्वांची निवड करण्यात आली आहे. सदरील बैठकीस जिल्ह्यातील तहसीलदार व नायब तहसीलदार उपस्थित होते.

युवा नेते सुजात आंबेडकर यांचा युवा आदिवासी संवाद दौरा संपन्न..!

अकोला /प्रतिनिधी :- वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी तेल्हारा तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी भागात आदिवासी पांड्यावर वस्ती वस्तीत जाऊन एका दिवसात बारा गावांना भेटी देत आदिवासी समाज बांधवांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. यावेळी युवा प्रदेश महासचिव राजेंद्र भाऊ पातोंडे,युवा जिल्हा अध्यक्ष श्रीकांत घोंगरे, महासचिव राजकुमार दामोदर संघटक समीर पठाण, तालुका अध्यक्ष जिया शाह, जिल्हा उपाध्यक्ष सुबोध डोंगरे,निलेश इंगळे, जिल्हा सचिव आंनद डोंगरे, श्रीकृष्ण देव कुनबी, महासचिव प्रा संदिप गवई, संघटक अनंता इंगळे व युवा आघाडी कार्यकर्ते पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. २८ ऑगस्ट रोजी सुजात आंबेडकर अकोल्याहून प्रस्थान करत छोटा आडगाव येथील कार्यकर्त्यांशी भेटून संवाद साधत सकाळी १०:०० वाजता पिंपळखेड, आदिवासी चावडी येथे समूह प्रमुख पटेल आणि सदस्य यांच्यासह आदिवासी ग्रामस्थ याच्याशी संवाद साधला. त्यानंतर अतिशय दुर्गम असलेल्या आणि रस्तेच नसलेल्या मोहपाणी येथे बाईकवर जाऊन आदिवासी समूहांच्या समस्या बाबत चर्चा केली. त्यानंतर दुपारी बाईकने अंबाबरवा तेथील आरोग्य,रस्ते जातीचा दाखला, समाज मंदिर, घरकुल योजने संदर्भात चर्चा केली. त्यानंतर जुनी तलई शाळा, विज, पिण्याचे पाणी, आरोग्य या बाबतीत सखोल चर्चा केली. तसेच चंदनपुर आदिवाशी भागात

विगास व ग्रामीण समस्या बाबत संवाद साधला. नई तलई पुनर्वसीत गाव आणि बोरवा भिल, येथे आदीवासी समाज बाधवानसोबत संवाद साधला. गावातील स्त्रीयाना ज्या खोऱ्यातून पिण्याचे पाणी आनावे लागते तेथे प्रत्यक्ष जावुन पाहणी केली. त्यानंतर गायरान येथे पाच गावच्या बैठकी आधी अदिवासी ग्रामस्थाच्या वतीने अदिवासी पारमपारीक पद्धतीने सुजात आबेडकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आदिवासी समुह नुर्त्यामध्ये सहभागाणी होऊन ठेका धरला. त्यानंतर गायरान येथे चिपी, करी, रूपागड आणि धोडा आखर चापाय गावातील आदिवासी ग्रामस्थाशी संवाद साधुन आदीवासी नृत्य पाहिले. त्यानंतर युवा आघाडी पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासोबत आदिवासी समूहांच्या घरी उडीद डाळ, मका रोटी, आणि भाकरी खाल्ली. त्यानंतर एदलाबाद येथे भेट देऊन स्थानिक कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. आदिवासी भागातील समस्या सोडविण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन लवकरच गावात जनता दरबार भरून समस्या सोडवण्यासाठी रुपरेखा तयार करण्याचा संकल्प युवा आघाडीने केला आहे. यावेळी युवा आघाडीचे पदाधिकारी आशिष रायबोले, पुरुषोत्तम आहिर तेल्हारा खंडूजी घाटोळ,उपाध्यक्ष संतोष हागे, सदानंद खंडेराव, प्रसिद्धीप्रमुख घंगाळ, दिनेश इंगळे, कपिल तायडे, पवन भुटके, अब्दुल आरिफ, विजय अढाव, मनोज हिरोळे, विशाल घ्यारे, राजू जहागीर, उमेश सरदार, कमरुद्दिन, अविनाश शिरसाट, नजीमोद्दीन, शेख अथहर, अमर मावसे, शुभम वाघोळ,नागेश तायडे, बाबल्या जांभळे या आदिवासी संवाद दौऱ्यात सहभागी होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE